# जाहिर प्रकटन

औरंगाबाद जिल्ह्यातील जनतेस कळविण्यात येते की, मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र. 104/2010 मध्ये मा. न्यायालयाने दिनांक 01 ऑक्टोबर, 2016 रोजी दिलेल्या आदेशाचे पालन करण्यासाठी व मा. न्यायालयाचे आदेशाचा अवमान होवु नये यासाठी औरंगाबाद जिल्ह्यातील कोणत्याही सार्वजनिक जागेवर, सार्वजनिक रस्ते, पायवाटा, इत्यादी ठिकाणी कोणत्याही प्रकारचे धार्मिक स्थळ किंवा धार्मिक स्थळाचे बांधकाम करु नये. तसेच जिल्हापरिषद, महानगरपालिका, पोलीस आयुक्त औरंगाबाद, पोलीस अधिक्षक (ग्रामीण) औरंगाबाद ,म्हाडा औरंगाबाद, मऔविम औरंगाबाद, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, मुख्याधिकारी नगरपरिषद, नगरपालिका, नगर पंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था व कटक मंडळे यांचे कार्यक्षेत्रात सार्वजनिक जागेवर कोणतेही धार्मीक स्थळ किंवा धार्मीक स्थळाचे बांधकाम होणार नाही याची संबंधित प्राधिकरणाने दक्षता घ्यावी व मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन करावे. या कार्यालयाचा टोल फ्री नं. 1077 व 2331077 आहे.

(मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने).

जिल्हाधिकारी औरंगाबाद करीता